**संत गाडगेबाबा उन्नत ग्राम योजनेअंतर्गत ७५ गावांमध्ये कृत्रिम बुध्दीमत्तेच्या सहाय्याने नागरिकांचे जीवनमान उंचवण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
### शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २४२५ /प्र.क्र.१६३/मातंक

बांधकाम भवन,मर्झबान पथ,फोर्ट
मंत्रालय मुंबई
तारीख: २२ जुलै, २०२६

**वाचा :**

१) कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र. कौविउ-२०२१/प्र.क्र. ३८ उद्योजकता (कौ.१) दिनांक १७ जुन,२०२२
२) नियोजन विभाग,शासन निर्णय क्र. डिएपी १०२५/प्र.क्र.३०६/का.१४८१,दिनांक ४ ऑगस्ट ,२०२५
३) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण-१७२५/प्र.क्र.२९९/मातं,दिनांक २७ नोव्हेंबर,२०२५
४) मा.मुख्य सचिव यांचे कडील दिनांक २४ मार्च,२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.
५) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २४२५/प्र.क्र.१६३/मातंक,दिनांक ३० एप्रिल,२०२६

**प्रस्तावना :**

कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय दिनांक १७ जून, २०२२ अन्वये कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्यानंतर "संत गाडगेबाबा उन्नत ग्राम योजनेंतर्गत ७५ गावांमध्ये कृत्रिम बुध्दीमत्तेच्या सहाय्याने नागरिकांचे जीवनमान उंचवण्यासाठी पथदर्शी प्रकल्प" राबविण्यासाठी या विभागाच्या दि. ३० एप्रिल, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद १ मधील टप्पा-१ मध्ये, सदर प्रकल्पासाठी शासन निर्णय दिनांक १७ जून, २०२२ मधील कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती ही जिल्हास्तरीय समिती म्हणून कार्यरत राहील, असे नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान दिनांक २० जून, २०२६ रोजी यशदा, पुणे येथे आयोजित कार्यशाळेत झालेल्या चर्चेनुसार, सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करणे हे काम प्रामुख्याने जिल्हा परिषद स्तरावर होणार

असल्याने प्रकल्पाचे नियोजन, वेळोवेळी बैठकांचे आयोजन करणे, समन्वय साधणे सोयीस्कर होण्याच्या दृष्टीने उपरोक्त जिल्हा स्तरीय समितीमध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद यांची सदस्य सचिव पदी नियुक्ती करण्याची जिल्हा परिषदांकडून मागणी करण्यात आली.

तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणी मध्ये TAI (Technical Anchor Institute) यांची महत्वाची भुमिका असल्याने ग्रामपंचायती व जिल्हयांसमवेत TAI यांना देखील प्रोत्साहनपर पारितोषिक अदा करण्यात यावे, असे सचिव (ग्रामविकास व पंचायतराज) यांनी निर्देशित केले.

त्यानुसार सदर प्रकल्पाच्या कामाच्या अनुषंगाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीच्या सदस्य सचिव पदी सहाय्यक आयुक्त, ( जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र) यांचे ऐवजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद यांची नियुक्ती करण्याचे तसेच TAI यांना प्रोत्साहनपर पारितोषिक अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक :-</u>**

ग्राम विकास विभागाच्या दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये "संत गाडगेबाबा उन्नत ग्राम योजनेंतर्गत ७५ गावांमध्ये कृत्रिम बुध्दीमत्तेच्या सहाय्याने नागरिकांचे जीवनमान उंचवण्यासाठी पथदर्शी प्रकल्प" या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय दिनांक १७ जून, २०२२ अन्वये स्थापन करण्यात आलेली “कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती” ही जिल्हास्तरीय समिती म्हणून कार्यरत राहील, असा निर्णय घेण्यात आला. सदर समितीमध्ये सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र हे सदस्य सचिव म्हणून कार्यरत आहेत. यामधील केवळ "संत गाडगेबाबा उन्नत ग्राम योजनेंतर्गत ७५ गावांमध्ये कृत्रिम बुध्दीमत्तेच्या सहाय्याने नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी पथदर्शी प्रकल्प" या प्रकल्पाकरिता सदर समितीमध्ये अंशत: बदल करून सदर प्रयोजनासाठी समितीचे सदस्य सचिव “उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद” यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. तसेच ग्राम विकास विभाग, दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत व जिल्ह्यांसमवेत TAI (Technical Anchor Institute) यांना देखील प्रोत्साहनपर पारितोषिके देण्यात येतील, ही तरतूद नव्याने समाविष्ट करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक **२०२६०७२२११४६०४३९२०** असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRASHANT VINAYAKRAO PATIL

Digitally signed by PRASHANT VINAYAKRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2B1BAD66664B1E11E3BF66DB1D526143E814DB5F8C505422AF66A5628314537E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9524CAB2D5A858B4A01FF72F5CAE5FDDC4F8C964F3AFC6B6249294AD88EC870D, cn=PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 2026.07.22 18:03:41 +05'30'

**(प्रशांत पाटील)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक उपक्रम) यांचे प्रधान सचिव मंत्रालय,मुंबई.
४. मा.उपमुख्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण, राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा / विधान परिषद
८. मा.विधानसभा व विधान परिषद सदस्य.
९. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०.महालेखापाल, महाराष्ट्र - १ (लेखापरीक्षा), मुंबई
११.महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखापरीक्षा), नागपूर
१२.अपर मुख्य सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१६.प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१७.प्रधान सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई
१८.सचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१९.सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

२०.सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
२१.संचालक, माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मंत्रालय, मुंबई
२२.सर्व विभागीय आयुक्त
२३.जिल्हाधिकारी (नागपूर, अमरावती, हिंगोली, पुणे व सिंधुदूर्ग)
२४.सर्व उपसचिव / अवर सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (नागपूर, अमरावती, हिंगोली, पुणे व सिंधुदूर्ग)
२६.निवड नस्ती कार्यासन मातंक, ग्राम विकास विभाग, मुंबई.